सायं. दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo-9422404740




युवा उद्योजक आकाश पालाकुडतेवाड यांच्या शुभ विवाहप्रसंगी शुभेच्छा देताना पत्रकार बालाजी जगतकर,मा. नगरसेवक नितीन रोडे, अभिजीत देशमुख, रतन आदोडे, भैय्यासाहेब आदोडे, राज जगतकर, प्रमोद रोडे,संतोष इंदरकर, अर्जुन सोळंके, आदी दिसत आहेत.

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ | अंक - १८६ | सोमवार, दि.१४ जुलै २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 | Issue - 186 | Monday, Dt.14 July 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4

# नगरपालिकेतील भ्रष्टाचारावर कारवाई न झाल्यास स्वातंत्र्यदिनी आत्मदहनाचा इशारा

## नितीन मुजमुले, बिलाल शेख, यांचा प्रशासनाला अल्टिमेटम

विश्वनायक न्यूज

बीड नगर परिषदेतील भ्रष्टाचाराचे सत्र थांबायला तयार नाही! शहरातील नागरिकांकडून सक्तीने कर वसूल करून त्या पैशांची कोट्यवधी रुपयांची लूट केल्याचा गंभीर आरोप अभियंता किरण देशमुख आणि त्यांच्या चमच्यांवर झाला आहे. बीड नगर परिषदेतील बांधकाम विभागात प्रचंड भ्रष्टाचार, बनावट इस्टिमेट, बोगस बिले, आणि कोट्यवधींचा अपहार हा ठरवून रचलेला कट असल्याचा आरोप नितीन मुजमुले आणि बिलाल शेख यांनी केला आहे. या भ्रष्टाचारी टोळीला जिल्हा प्रशासनाची छत्रछाया मिळाली आहे का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

बीड नगर परिषदेच्या बांधकाम विभागात २०२३-२४ आणि २०२४-२५ या आर्थिक वर्षांत सिमेंट रस्ते व नाल्यांच्या कामांसाठी बनावट इस्टिमेट तयार करून काम न करता कोट्यवधी रुपयांची बोगस बिले काढून शासन, प्रशासन आणि बीड शहरातील नागरिकांची सरळ फसवणूक करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.या भ्रष्टाचाराची माहिती गेल्या वर्षभरात अनेक दैनिक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली असून, विविध संघटना, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि राजकीय कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, जिल्हा सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन), मुख्याधिकारी आदींकडे वेळोवेळी तक्रारी दाखल करून आंदोलनेही केली. तरीही प्रशासनाने झोपेचे सोंग घेत कोणतीही ठोस कारवाई केली नाही.या पार्श्वभूमीवर, नितीन मुजमुले आणि बिलाल शेख यांनी प्रशासनाला पंधरा दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे.जर जिल्हा प्रशासनाने नगर परिषदेच्या बांधकाम विभागातील भ्रष्टाचाराची चौकशी तातडीने सुरू केली नाही तर येत्या १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त येणाऱ्या मंत्र्यांच्या ताफ्यासमोर किंवा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामूहिक





आत्मदहन करू, असा थेट इशारा बिलाल शेख आणि नितीन मुजमुले यांनी दिला आहे.अभियंता किरण देशमुख, सहाय्यक अभियंता योगेश हाडे, मंगेश भंडारे यांनी संगनमत करून बनावट इस्टिमेट तयार केली, बोगस बिले काढली आणि कोट्यवधींचा अपहार केला, असा ठपका ठेवण्यात आला आहे. दररोज वर्तमानपत्रांतून आणि आरटीआय कार्यकर्त्यांच्या आंदोलनांतून हा घोटाळा उघड होत आहे. नगर परिषदेकडून जनतेकडून जबरदस्तीने कर वसूल केला जातो, पण तो निधी शहर विकासासाठी खर्च होण्याऐवजी अधिकारी व त्यांच्या मोजक्या पंटरांच्या खिशात जातो, असा घणाघात बिलाल शेख आणि नितीन मुजमुले यांनी केला.

### भ्रष्ट अधिकाऱ्यांविरोधात असंतोषाचे वातावरण

मुख्याधिकारी निता अंधारे आणि अभियंता किरण देशमुख यांनी केलेल्या कोट्यवधी भ्रष्टाचारा विरोधात शेकडो तक्रारी केल्या परंतु मुग गिळून बसलेल्या प्रशासकाने कसलीही कारवाई न करत अर्थपूर्ण दुर्लक्ष केले. त्यामुळे आत्ता एकच पर्याय राहिला आहे, रस्त्यावर उतरून आंदोलन करून झोपेचे सोंग घेत असलेल्या प्रशासकाला चांगलाच धडा शिकविण्यासाठी येत्या १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त येणाऱ्या मंत्र्यांच्या ताफ्यासमोर किंवा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामूहिक आत्मदहन करू, असा थेट इशारा बिलाल शेख आणि नितीन मुजमुले यांनी दिला आहे.

### या मागण्यांसाठी करण्यात येणार आंदोलन...

२०२३-२४ आणि २०२४-२५ या दोन आर्थिक वर्षांतील सर्व कामांचे ऑडिट करावे. बनावट इस्टिमेट तयार करून काढलेली बोगस बिले व संबंधित भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी.बीड शहर हद्दीतील अनधिकृत गुंठेवारी प्रकरणे रद्द करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी.या मागण्या पंधरा दिवसांत मान्य न केल्यास येत्या १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त येणाऱ्या मंत्र्यांच्या ताफ्यासमोर किंवा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामूहिक आत्मदहन करू, असा थेट इशारा नितीन मुजमुले आणि बिलाल शेख यांनी दिला आहे.

## काकड हिरा येथील विष्णुपंत जायभाये व परिवाराचा स्तुत्य उपक्रम

**पाटोदा (प्रतिनिधी)**

**काकडहिरा येथील विष्णुपंत जायभाय , व देविदास जायभाय यांच्या मातोश्री ,मा सरपंच महादेव जायभाय यांच्या आजी वहालाबाई यांचं दि.१२ शनिवार रोजी रात्री १ वाजण्याच्या सुमारास वयाच्या ९६ व्या वर्षी व वृद्धकाळाने दुःखद निधन झालं त्यांचा दि.१३ रविवार रोजी सावडण्याचा कार्यक्रम होता त्यानिमित्त , जायभाये परिवाराने संपूर्ण अस्तिची (राख) जमा करून शेतामध्ये ती अस्ति विसर्जन नदीला किंवा तीर्थक्षेत्राला न टाकता स्वतःच्या शेतामध्ये खड्डे करून पाच आंब्याचे झाडाचे वृक्षारोपण करून समाजाला एक चांगला संदेश दिला आहे.**



खरंच हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद असून अस्ति ही गंगेला पैठणला नेऊन टाकण्यात येते त्या कारणाने संपूर्ण पाणी प्रदूषित होते. त्यामुळे हे संपूर्ण टाळण्यासाठी मृत व्यक्तीच्या नावाने पाच आंब्याची झाडे लावले तर झाडाच्या रूपाने ती व्यक्ती ही जिवंत राहते आणि पर्यावरणाचा समतोल ही राखण्यात मदत होते.यामुळे काकड हिरा येथील विष्णुपंत जायभाये व परिवाराचा स्तुत्य उपक्रमांचे पंचक्रोशीत कौतुक होत आहे.

आज्जीच्या सावलीत बसून पुर्ण जायभाय परिवार आशीर्वाद घेईल- महादेव जायभाय कायमस्वरूपी आठवण राहावी आज्जीच्या जाण्याने जायभाय परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परंतु आज्जीच्या कमतरता भासू नये म्हणून आज्जीच्या अस्तिच विसर्जन शेतात झाड लावले आहे. कायम त्या झाडाची सेवा करत राहील आणि आज्जीच्या सावलीत बसून आज्जीचे पुर्ण जायभाय परिवार आशीर्वाद घेईल..महादेव जायभाय मा.सरपंच काकहिरा ता.पाटोदा जि.बीड

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आम आदमी पार्टी स्वबळावर लढणार शासकीय विश्रामगृह येथे बैठक संपन्न

### मा. संग्राम घाडगे पाटील संघटन मंत्री आम आदमी पार्टी महाराष्ट्र राज्य

बीड (प्रतिनिधी)

बीड येथे आम आदमी पार्टीच्या वतीने मराठवाड्यातील सर्व जिल्हा पदाधिकारी यांची मा. संग्राम गाडगे पाटील संघटन मंत्री महाराष्ट्र राज्य व मा. वैद्यनाथ राठोड सचिव महाराष्ट्र राज्य यांच्या यांच्या नेतृत्वात व माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष यांच्या नियोजनाखाली मराठवाड्यातील सर्व जिल्हाध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी यांची विशेष बैठक पार पडली या बैठकीमध्ये महाराष्ट्राचे प्रभारी मा. प्रकाशजी जारवाल आमदार दिल्ली व राष्ट्रीय प्रवक्त्या मा.प्रीती शर्मा मेनन महाराष्ट्राचे कार्यकारी अध्यक्ष मा. अजितजी फाटके पाटील. यांच्या उपस्थितीमध्ये मुंबई येथे पत्रकार परिषद संपन्न झाली त्या पत्रकार परिषदेमध्ये घोषणा करण्यात आली की महाराष्ट्रामध्ये येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका या स्वबळावर लढणार आहे हाच संदेश घेऊन आज बीडमध्ये बैठक आयोजित करण्यात आली व या बैठकीमध्ये मराठवाड्यातील सर्व जिल्हाध्यक्षांकडून मराठवाड्याच्या निवडणुका लढल्या जाण्यासाठी आढावा



व उमेदवाराची चाचपणी करण्याचे आदेश देण्यात आले जिथे पदाधिकारी नसतील त्या ठिकाणी त्यांच्या नियुक्ती देणे निवडणुकांसाठी उमेदवार चाचणी करणे आम आदमी पार्टीचे दिल्ली व पंजाब मध्ये होत असलेले विकास कामे त्याच पद्धतीने महाराष्ट्रात देखील जिल्हा परिषदेच्या शाळा नगरपालिकेतील शाळा स्वास्थ केंद्र दवाखाने याविषयी घेऊन जनतेसमोर जाऊन आम आदमी पार्टीने केलेली कामे जनतेला सांगावी व येणाऱ्या काळामध्ये आम आदमी पार्टी जास्तीत जास्त उमेदवार स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये उभा करून आपले प्रदर्शन जास्तीत जास्त कसे चांगले करता येईल याविषयी मार्गदर्शन केले सर्व जिल्हाध्यक्षांनी या बैठकीमध्ये आपापल्या जिल्ह्याची परिस्थिती निवडणुकीला येणारे अडथळे व ते सोडवण्याचा प्रयत्न कसा केला जाईल यावरती विस्तृत चर्चा करण्यात आली व वरिष्ठांनी यावर चर्चा करून जिल्हा अध्यक्षांचे समाधान केले लवकरच महाराष्ट्राचे प्रभारी माननीय प्रकाशजी जारवाल यांचा दौरा लवकरच मराठवाड्यामध्ये सर्व कार्यकर्त्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे असे आदेश देण्यात आले यावेळी महाराष्ट्राचे सचिव मा. वैद्यनाथ राठोड मा. संग्राम जी घाडगे पाटील संघटन मंत्री महाराष्ट्र राज्य बीड जिल्हा अध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे संभाजीनगर जिल्हाध्यक्ष मा. चव्हाण धाराशिव चे जिल्हाध्यक्ष माननीय राहुल माकोडे लातूरचे जिल्हाध्यक्ष मा. अश्विन जी नलबले हिंगोली चे जिल्हाध्यक्ष मा. बालाजी देशमुख पाटील जालन्याचे जिल्हाध्यक्ष मा. अंकुश जी कांबळे जालना महानगरचे अध्यक्ष मा. संजय हिवाळे बीड जिल्ह्याचे कोषाध्यक्ष मा. कैलास चंद पालीवाल, शहराध्यक्ष सय्यद सादेक, रफिक पठाण अल्पसंख्याक विभाग प्रमुख, मिलिंद पाळणे शहर सचिव, अजम खान तालुका उपाध्यक्ष बीड, परळी तालुकाध्यक्ष व्यंकट मुंडे, धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष पिंपळे सर, धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष देशमुख ,इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## वसंतनगर ग्रामपंचायतच्या महिला सरपंचसह कुटुंबावर प्राणघातक हल्ला ५ ते ७ जण गंभीर जखमी

परळी (प्रतिनिधी)

परळी तालुक्यातील लमानतांडा ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वसंतनगर ग्रामपंचायत महिला सरपंचसह कटूंबावर गावातील १५ ते २० लोकांनी प्राण घातक हल्ला केला आहे. सरपंचदाचा राजीनामा का देत नाही म्हणून हल्ला करण्यात आला आहे. ५ ते ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांचावर अंबाजोगाई येथील स्वराती सरकारी दवाखान्यात उपचार सूरू आहेत. हल्लाखोरावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी राठोड कुटुंब यांनी केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, वसंतनगर तांडा येथे रात्री नऊ वाजता माजी सरपंच श्री दत्तात्रय सखाराम राठोड याच्या सांग्यावरून विद्यपानचे महिला सरपंच सौ.शाहूबाई विजय राठोड सरपंच पदाचा राजीनामा का देत नाही म्हणून



पूर्ण कुटूंबावर प्राण घातक हला करण्यात आला गावातील
१)रवी रामराव चव्हाण
२)विकास रामराव चव्हाण
३)अजित बबन चव्हाण
४)नितीन गजानन उर्फ गजानद चव्हाण ५)अभिजित बबन चव्हाण आणी इतर पंधरा ते वीस जना नी मिळून सरपंचसह कुटूंबातील आठ जणांना प्राणघातक हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला याचे मुख्य सूत्र धार हे माजी सरपंच श्री दत्ता सखाराम राठोड हे आहेत. अशी प्रतिक्रिया देतांना सरपंचपती विजय राठोड यांनी दिली आहे. याबत पोलिसात तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**अंबाजोगाई दवाखान्यात उपचार सूरू**
**हल्लाखोरावर गुन्हा दाखल**
**करावा - राठोड कुटुंबीयांची मागणी**
**सरपंचदाचा राजीनामा का देत नाही म्हणून हल्ला**

## जनसुरक्षा नव्हे जनमुस्कटदाबी! - विधेयकाच्या विरोधात सामाजिक कार्यकर्त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने :- डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्र शासनाने विधिमंडळ अधिवेशनात मंजूर केलेले जनसुरक्षा विधेयक २०२५ हे लोकशाहीला घातक असून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे आहे, असा आरोप करत आज दि.१४ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते व माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे जिल्हा प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, राज्यपाल पी.सी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासाठी मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून सादर करण्यात आले.निदर्शनात शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक कॉम्रेड.नामदेव चव्हाण, आयटक नेते,माजी सैनिक अशोक येडे बीड जिल्हाध्यक्ष (आप), रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष (इंटक), डी .जी.तांदळे अध्यक्ष किसानसभा महाराष्ट्र राज्य,कॉम्रेड. भाऊराव प्रभाळे, बीड जिल्हा सचिव भारतीय कम्युनिस्ट पक्ष,




जगन्नाथ बहीर, मराठवाडा शिक्षक नेते, काँम्रेड बी.एस. दहिवडे, सखाराम बेगडे बीड जिल्हा सचिव (इंटक), कॉम्रेड. व्ही.एन.सवासे आदी सहभागी होते.

डॉ. ढवळे म्हणाले की, हे विधेयक राजकीय हेतूने प्रेरित असून सरकारला जाब विचारणाऱ्या कार्यकर्ते, पत्रकार व संघटनांचे तोंड बंद करण्याचे साधन आहे. संशयावरून कोणालाही अटक, संघटना बेकायदेशीर ठरवणे, मालमत्ता जप्ती, बँक खाती गोठवणे यांसारख्या अमर्याद अधिकारांची तरतूद या विधेयकात आहे.

जनसुनावणीशिवाय पारित करण्यात आलेल्या या विधेयकावर १२ हजारांहून अधिक नागरिक व संघटनांनी आक्षेप नोंदवले असून, 'नक्षलवाद' या शब्दाचा स्पष्ट उल्लेख नसतानाही 'कडव्या डाव्या विचारसरणी' या संज्ञेच्या आधारे कार्यकर्त्यांवर कारवाईचा धोका निर्माण झाल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले.

लोकशाहीच्या रक्षणासाठी मागणी - विधेयक तातडीने रद्द कराहे जनसुरक्षा नव्हे तर जनमुस्कटदाबी विधेयक आहे. लोकशाहीत आंदोलन व प्रश्न विचारण्याचा अधिकार मूलभूत आहे. या विधेयकाचा गैरवापर होण्याची शक्यता लक्षात घेता ते तातडीने रद्द करण्यात यावे, अशी ठाम मागणी

### पाटोद्यात अनोखा वाढदिवस: वटवृक्षाचा वाढदिवस साजरा करताना

# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे विद्यार्थी व शिक्षक

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा येथील केंद्रीय प्राथमिक जिल्हा परिषद शाळेने नुकताच एक अतिशय अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम राबवला. वाढदिवस नेहमी माणसांचा साजरा होतो, पण या शाळेच्या विद्यार्थी आणि शिक्षकांनी चक्क एका वटवृक्षाचा वाढदिवस साजरा करून पर्यावरणाबद्दलची आपली बांधिलकी दाखवून दिली.या अनोख्या वाढदिवस सोहळ्या निमित्त शाळेचे विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम, या वटवृक्षाची पूजा करून त्याला फुलांनी आणि माळांनी सजवण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्साहाला उधाण आले होते. त्यांनी मिळून वटवृक्षाभोवती 'हॅपी



बर्थडे' गात टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला.यावेळी मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना झाडांचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले, झाडे आपल्याला ऑक्सिजन देतात, सावली देतात आणि पर्यावरणाचा समतोल राखतात. त्यामुळे झाडांची काळजी घेणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे.या वाढदिवसाच्या निमित्ताने शाळेच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावली आणि त्यांच्या संगोपनाची शपथ घेतली.

हा उपक्रम केवळ एका झाडाचा वाढदिवस साजरा करण्यापुरता मर्यादित नव्हता, तर तो पर्यावरणाचे महत्त्व आणि प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये निसर्गाप्रती आदर निर्माण करण्याचा एक प्रयत्न होता. पाटोद्यात केंद्रीय प्राथमिक जिल्हा परिषद शाळेच्या या उपक्रमाने समाजा समोर एक आदर्श ठेवला असून, इतर शाळांसाठीही तो प्रेरणादायी ठरू शकतो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुरेखा खेडकर मॅडम यांनी केले


# रिल्स बनविण्याच्या वेडापायी, जवळ करू नका मृत्यूची खाई

### घरी वाट पाहताहेत तुमचे बाबा आणि माई आयान खान यांचे भावनिक आवाहन

बीड (प्रतिनिधी)

सध्या पावसाळ्याचा हंगाम सुरू आहे. यामुळे अनेक निसर्गरम्य स्थळी अंगात तरुण रक्त सळसळणारे तरुण-तरुणी पर्यटनासाठी जातात. काहीजण तेथील दृश्य व्हिडिओ किंवा छायाचित्र रूपात चित्रित करण्यासाठी नको ते धाडस करतात. यामुळे त्यांच्या जीवावरही बेतते. आजपर्यंत अशा अनेक घटना घडल्या आहेत की नको ते धाडस करण्यापायी अनेकांचे जीव गेले आहेत. यामुळे निसर्गरम्य स्थळी गेल्यानंतर बेभान झालेल्या तरुण-तरुणींनी निसर्ग सौंदर्याचा आणि पर्यटनाचा भरपूर आनंद घ्यावा मात्र अवाजवी धाडस करू नये. रिल्स बनविण्याच्या वेडापायी खाई जवळ जाऊ नये. नाहीतर तुमच्या जीवावर बेतले तर घरी वाट पाहणारे तुमचे बाबा आणि माईंना अतोनात दुःख होते. यामुळे असे अवाजवी धाडस करू नका. आपल्या आई-बाबांना दुःखी कष्टी करू नका. असे भावनिक आवाहन अयान खान यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात अधिक नमूद केले आहे की, बीड शहरातील अनेक जण पावसाळ्याच्या हंगामात बिंदुसरा तलाव, कपिलधार, सौताळ्याचा धबधबा अशा निसर्गरम्य वातावरणात जाऊन पर्यटनाचा आनंद घेतात. या स्थानाशिवाय बीडकरांना अन्य जागी जाऊन पर्यटनाचा आनंद घेण्यासारखे स्थळ नाही म्हणून या तिन्ही ठिकाणी पावसाळ्याच्या हंगामात मोठ्या प्रमाणात पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी बीड शहरातील नागरिक जातात. तिथे गेल्यानंतर नैसर्गिकरित्या वाहणारे पाणी पाहून त्यात उतरून पुरेपूर आनंद घेण्याचा मोह अनेकांना आवरत नाही. हा आनंद घेताना प्रत्येकाने आपली सद्सद्विवेक बुद्धी जागृत ठेवून



वावरले पाहिजे. जेणेकरून आपल्याला काही अपाय होणार नाही किंवा आपल्या जीवावर बेतणार नाही. ज्यामुळे आपल्या पाठीमागे असलेले आपले आई-बाबा, बहिण-भाऊ यांना दुःख होणार नाही. अशारितीने पर्यटनाचा आनंद घ्यावा असे आवाहन अयान खान यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

## अतुल गायकवाड यांना समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर :- शेख युनूस

बीड (प्रतिनिधी)

अतुल गायकवाड यांना समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार बी. एस. एफ बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार सोहळा अमरावती जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात होणार असून चित्रपट क्षेत्रातील प्रसिद्ध अभिनेता, अभिनेत्री, दिग्दर्शक, मॉडेल्स यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून कला, पत्रकारिता, समाजसेवा, साहित्य, कृषी अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या लोकांना व समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे.अशी माहिती संस्थेच्या शितल गजभिजे यांनी दिली.




# साठे जयंतीच्या अध्यक्षपदी पुरुषोत्तम वीर तर सचिवपदी मिलिंद सरपते यांची निवड

बीड (प्रतिनिधी)

बीड शहर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सव समितीची स्थापना करण्यात आली असून, शासकीय विश्रामगृह बीड बैठकी वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा वीर विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार पुरुषोत्तम वीर यांची अध्यक्षपदी आणि मिलिंद सरपते यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे. सहसचिवपदी संदीप जाधव, कोषाध्यक्षपदी रोहन मगर आणि सदस्य म्हणून आकाश साबळे, युनुस भाई, राजकुमार जोगदंड यांची निवड झाली आहे. पाशा भाई यांना उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि शहराध्यक्ष लखन जोगदंड व तालुकाध्यक्ष किरण वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही समिती कामकाज करत आहे.या समितीद्वारे वंचित, बहुजन आणि शोषित समाजासाठी योगदान देणाऱ्या अण्णाभाऊ साठेंच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्याचा प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जातील.पुरुषोत्तम वीर





यांनी यावेळी सांगितले की, अण्णाभाऊ साठे हे वंचित समाजासाठी आदर्श व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या कार्याची जयंती उत्सव समितीद्वारे समाजापर्यंत पोहोचविणे हा आमचा उद्देश आहे.मिलिंद सरपते यांनीही सांगितले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या अभंगांनी आणि साहित्याने समाजाला एकत्र करण्याचे काम केले आहे. त्यांच्या जयंती उत्सवातून त्यांच्या विचारांचा आणि संदेशाचा प्रसार व्हावा, यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.या उत्सवाद्वारे समाजातील शोषित घटकांना सशक्त करण्यासाठी आणि सामाजिक समरसतेसाठी काम करण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला आहे. लवकरच या जयंती उत्सवाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित होणार आहेत. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कसार पेठ येथील हातभट्टी दारूचा अड्डा उध्वस्त

### पोलीस निरीक्षक गणेश कराड यांची फ्लॅश आउट मोहीम सुरज

माहूर /जावेद शेख

माहूर पोलीस ठाण्यात महिनाभरा आधी रुजू झालेले पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी फ्लॅश आउट मोहीम मनावर घेतलेली दिसत असल्याने त्यांनी माहूर तालुक्यातील मौजे कसार पेठ येथे शेतशिवारातील नाल्यात सुरू असलेल्या हातभट्टी दारूचा अड्डा उध्वस्त करून दारू बनविण्याचे फस फसते रसायन सॅम्पल साठी घेत ७०० लिटर दारू बनविण्याचे इतर साहित्य जागेवरच नष्ट करून एका विरुद्ध गुन्हा दाखल केल्याची घटना दि १३ रोजी सकाळी ८ .२२ वाजता घडली आहे

पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी हातभट्टी दारू बनविणारे तसेच देशी दारू विनापरवानगी विक्री करणारे यासह



कुठल्याही प्रकारची अवैध रित्या दारू विक्री होत असल्यास त्यावर कडक कारवाई सुरू केली असून पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या आपरेशन फ्लॅश आउट कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी मनावर घेतल्याने गेल्या महिन्याभरात अनेक गुन्हे दाखल झाले असून लाखो रुपयांचे दारू बनविण्याचे साहित्य नष्ट करण्यात आल्याने अवैध दारू विक्री करणाऱ्यांच्या मनात धडकी भरली असून ज्या गावात गुन्हे दाखल झाले त्या गावात आपसूकच दारू विक्री आणि पिणाऱ्यांचे प्रमाण आपसी तंटे कमी झाल्याने कमी झालेले दिसत आहे

कुठल्याही प्रकारची अवैधरित्या दारू विक्री होत असल्यास नागरिकांनी थेट माझ्याशीच संपर्क साधावा असे आवाहन पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी केले असून सदरील कार्यवाही पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली स पो नी संदीप अन्येबोईनवाड यांनी केली असून दारूचे साहित्य नष्ट करून एका विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे यावेळी पोलीस नाईक बाबु जाधव पवन राऊत सोनसळे सोनटक्के यांचे पोलीस कर्मचारी होमगार्ड उपस्थित होते

## सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट असोसिएशन बीड व सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट अॅकडमी व चॅम्पियन्स कराटे अॅकडमी माजलगाव



मालेगांव (प्रतिनिधि):-

यांच्या वतीने आज दिनांक १३ जुलै रविवार .रोजी जुनी नगरपालिका या ठिकाणी बेल्ट परीक्षा व बक्षीस वितरण चा कार्यक्रम ठेवण्यात आला होता या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी दिवसभर कडी मेहनत करून कलर बेल्ट व ब्लॅक बेल्ट परीक्षा पार पाडली व ब्लॅक बेल्ट परीक्षा साठी .प्रेम काटूळे. हा विद्यार्थी होता यामध्ये रेनशी शेख माजेद सर. यांनी आपल्या तालुक्यासाठी जे कार्य केले वो बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड करून आपल्या माजलगाव शहराचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचण्याचा कार्य केल्याबद्दल यांचे सर्व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला या कार्यक्रमांमध्ये अध्यक्ष म्हणून लाभलेले. सुंदरराव सोळंके महाविद्यालय चे प्रोफेसर लतीफ पठाण सर. वो प्रमुख पाहुणे .डअ्झख पार्टीचे माजलगाव तालुका उपाध्यक्ष समीर शेख. तालुका मेंबर .हाफिज रफिक पठाण. बुखारी शाळेचे असद सर. शकील कुरेशी साहेब. जिल्हा परिषद शाळेचे मुजम्मील खतीब सर. श्रीनिवास जालवाड सर. हे होते.सर्व विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ट्रॉफी बेल्ट प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन रेनशी मजेद सर व सोहेल यांनी केले कार्यक्रमाचे आयोजक .अमन मोमीन. रयान शेख . रयान मोमीन. अमिना पठाण. रोहित धारक. हे होते व सूत्रसंचालन अंजली ढेरे व प्रस्ताविकता पूजा दळवी व आभार प्रदर्शन सोहेल बागवान सर .यांनी केले या कार्यक्रमांमध्ये पालकांनी सुद्धा हजरी लावली

# जीवघेणी डोळेझाक

स्पेशल रिपोर्ट

प्रशांत बाफना/८०५५४४०३८५

देशाच्या अनेक भागात मल्टिस्टेटच्या माध्यमातून उभारलेल्या खाजगी सावकारीतून सामान्य ठेवीदारांचे मोठे नुकसान होत आहे जास्त व्याजाच्या अमिषाला बळी पडून सामान्य ठेवीदार अशा मल्टिस्टेटमध्ये आपल्या आयुष्याची जमा पुंजी ठेवतो आणि काही दिवसांनी मल्टिस्टेटचे दिवाळे निघाले की त्या ठेवीदारांच्या आयुष्याचा देखील शिमगा होतो हे चित्र कमीअधिक फरकाने सर्वत्र पाहायला मिळत आहे मात्र अशा मल्टिस्टेट काय किंवा इतर वित्तीय संस्था काय त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठीही प्रभावी यंत्रणाच आज सरकार नावाच्या व्यवस्थेकडे आहे असे दिसत नाही एका मोठ्या आणि अनिर्बंधपणे फोफावलेल्या क्षेत्राकडे सरकारची डोळेझाक जीवघेणी आहे

ग्रामीण भागापर्यंत वित्तपुरवठा अधिक सोयीचा व्हावा यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बॅंका आणि खाजगी बँकाच्या जोडीला नागरी बॅंकाचे जाळे देशभरात निर्माण झाले त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रीय स्तरावर रिझर्व्ह बँक आणि राज्याच्या स्तरावर त्या त्या राज्यातील सहकार कायद्यांतर्गत निर्माण केलेली व्यवस्था होती महाराष्ट्रासारख्या राज्यात सहकाराची बीजे अधिक रुजलेली होती त्यामुळे महाराष्ट्रात पतसंस्थांचे जाळे देखील मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेले होते नागरी बॅंका काय किंवा पतसंस्था काय या सहकाराच्या तत्वावर उभारण्यात आल्या मात्र सुरुवातीची काही वर्षे गेल्यानंतर विशेषतः मागच्या दोन दशकांत सहकारात घुसलेल्या अनेकांना सहकारी कायद्याची बंधने जाचू लागली या बंधनातून मुक्त होऊन मनमानी व्यवहार करता आले तर बरे ही मानसिकता वाढीस लागली आणि त्यातूनच मल्टिस्टेट नावाच्या व्यवस्थेचा उद्य झाला नागरी बॅंक स्थापन केली तर दुहेरी नियंत्रण पतसंस्थावर देखील सहकार विभागाचे नियंत्रण अशा काळात देशात २००२ च्या कायद्याने मल्टिस्टेट नावाच्या व्यवस्थेला मोकळी वाट करून देण्यात आली विशेष म्हणजे त्यावेळी सहकार या विषयात केंद्र सरकारकडे स्वतंत्र व्यवस्था नव्हती विभागही नव्हता म्हणून चक्क कृषी खात्याकडे मल्टिस्टेट नोंदणीचे काम देण्यात आले आणि त्यातून मग मल्टिस्टेटचे पीक फोफावायला सुरुवात झाली हा झाला इतिहास आता या इतिहासात मल्टिस्टेटच्या नावाच्या वल्लीचा विस्तार कसा झाला हे पाहायला गेले तर अनेक धक्कादायक गोष्टी समोर येतात ज्या महाराष्ट्रात सहकार रुजला असे आपण म्हणतो तोच महाराष्ट्र अशा अनिर्बंध मल्टिस्टेट नोंदणीत देशात आघाडीवर आहे आजघडीला देशभरात नोंदणी असलेल्या मल्टिस्टेटची संख्या आहे १५५६ आणि त्यातील ६५४ एकटच्या महाराष्ट्रात आहेत म्हणजे देशाच्या ४०%मल्टिस्टेट अस्तित्वात येण्यापूर्वी ज्या संस्था सहकार विभागाकडे पतसंस्था म्हणून नोंदविल्या गेल्या होत्या त्यातही लगेच आपल्या संस्थेचे रुपांतर मल्टिस्टेटमध्ये करुन घेतले परिणामी त्याना नियंत्रण मुक्त व्यवहार करणे सोपे झाले कृषी विभाग एकदा नोंदणी करून मोकळा होतो पुन्हा कोणी फारसे विचारणार नाही त्यामुळे काहीही करायला मोकळे रान मिळते याच मानसिकतेतून अनेक मल्टिस्टेटचा कारभार झाला आहे याला अनेक सन्माननीय अपवाद आहेत नाही असे नाही आजही अनेक मल्टिस्टेटनी चांगले व्यवहार करुन अर्थव्यवस्था बळकट करायला मदत केलेली आहे हे नाकारता येणार नाही पण मल्टिस्टेटवर नियंत्रण ठेवणारी व्यवस्था दीर्घकाळ उपलब्ध नसल्यानेच आज जे फसवणूकीचे प्रकार समोर येत आहेत ते होऊ शकले हे देखील कटू वास्तव आहे मल्टिस्टेटने व्याज किती द्यायचे कर्ज कोणाला द्यायची कशी द्यायची ठेवी घेताना काय नियम असावेत याची काहीच स्पष्टता कायद्यात नाही ज्याचे त्यानी ठरवावे असे सारे धोरण म्हणून मग अनेक संस्थांनी ठेवींवर अगदी १६-१७%पर्यत व्याज देऊ केले आलेला पैसे कर्ज स्वरूपात देताना आपल्याच संबंधातील लोकांना संस्थांना कंपन्याना दिला गेला त्यामुळे चार दोन लोक बुडाले की सारी संस्था बुडते असे चित्र विशेषतः महाराष्ट्रात निर्माण झाले आहे ठेवीदार सुध्दा जास्त व्याजाच्या अमिषाला भुलतो मल्टिस्टेटच्या ठेवीना विमा संरक्षण नाही त्याच्या बाबतीत कठोर कायदा नाही याचा साधा विचार ठेवीदार करीत नाही आणि सरकार देखील त्याबाबत जागृती करीत नाही अशी सारी परिस्थिती आहे नाही म्हणायला सर्वच वित्तीय संस्थाना लागू असणारा एमपीआयडी हा कायदा मल्टिस्टेटला देखील लागू आहे मात्र या कायद्याची अंमलबजावणी इतक्या संथगतीने असते की या कायद्याचा वापर करून ठेवीदारांना ठेवी परत मिळायला किती तरी वर्ष वाट पाहावी लागते एमपीआयडी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला नंतर त्या वित्तीय संस्थेच्या संचालकांच्या मालमत्ताची महिती जमवून राज्य शासनाकडे पाठवायची राज्य शासनाने मग अधिकारी नियुक्त करुन त्या मालमत्तांचा लिलाव करायचा अशी सोपी वाटणारी तरतूद कायद्यात आहे मात्र या सोप्या




गोष्टीला देखील अनेक वर्षे लागतात त्यामुळे मग या कायद्याचा उपयोग काय असा प्रश्न आहेच याच अशा पळवाटांचा गैरफायदा मग वित्तीय संस्था उचलत आहेत ठेवीदारांची फसवणूक झाली त्याना ठेवी परत मिळत नसतील तरी त्या संस्थेचे फक्त उंबरठे झिजवायचे गुन्हे दाखल करुन काय होणार एकदा का संचालक जेलमध्ये गेले मग पैसे देणार कोण असली मखलाशी सुरुच असते म्हणजे संचालक बाहेर असून देखील काही फायदा नाही आणि आत जाऊन देखील ठेवीदारांच्या नशिबी केवळ रडणे हेच आलेले असेच चित्र सध्या महाराष्ट्रात तरी पाहायला मिळत आहे कोन्या एका संस्थेबद्दल काही सांगावे असे नाही मात्र कमी अधिक फरकाने मल्टिस्टेटच्या मनमानीवर जे कोणाचेच नियंत्रण नाही आता केंद्र सरकार फरच सहकार कायदा अस्तित्वात आल्यानंतर किमान काही तरतुदी झाल्या आहेत पण केंद्राची व्यवस्था निर्माण व्हायला आणखी दोन तीन वर्षे लागतील तोपर्यंत ठेवीदारांचे भवितव्य काय? एमपीआयडीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे गेल्यानंतर दोन दोन महिने त्यावरची धूळ झटकली जात नसेल तर ही डोळेझाक नेमकी कोणाच्या हिताची आहे ? न्यायाची अपेक्षा करायची ती कोणाकडून?

प्रशांत बाफना प्रतिनिधी

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड – ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com